EXB 5

भोर येथील मे. ज्युडि. मॅजि. वर्ग १ साहेब यांचे कोर्टात.

फौ.ख.नंबर /२०२४

विश्व आर्टस् ॲण्ड डेकोरेटर तर्फे प्रो. प्रा. सौ. ईश्वरी विक्रांत डोईफोडे — फिर्यादी

विरूध्द.

श्रीमती जयश्री अनिल लिंबोरे — आरोपी

प्रतिज्ञापत्र

याकामी मी **विश्व आर्टस् ॲण्ड डेकोरेटर तर्फे प्रो. प्रा. सौ. ईश्वरी विक्रांत डोईफोडे** वय – ३४ वर्ष, धंदा – व्यवसाय, रा. कमानी जवळ राजवाडा चौक भोर, ता. भोर, जि. पुणे सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की,

Order
Read and record.

NEHA K NAGARGOJE Digitally signed by NEHA K NAGARGOJE Date: 2024.08.28 17:35:00 +0530

J.M.F.C,Bhor.

फिर्यादी हे कसबे भोर ता. भोर जि. पुणे येथील रहिवासी असुन फिर्यादी लग्न व इतर धार्मिक कार्यामध्ये डेकोरेशन व संबधीत इव्हेंट मॅनेजमेंटचे काम करतात. फिर्यादी यांनी यापुर्वी केलेल्या कामाचे व्हिडिओ व फोटो तसेच व्यवसायाबद्दलची माहिती फिर्यादी यांनी त्यांचे इन्स्टाग्राम व युटयुब अकाऊंटला अपलोड केलेले असुन सदर व्हिडीओ व फोटो आणि माहिती घेवुन अनेक लोकं फिर्यादी यांचे कडे त्यांचे लग्न कार्य व इतर धार्मिक विधीं करिता डेकोरेशन व इव्हेंट मॅनेजमेंटचे काम देतात. आरोपी यांनी फिर्यादी यांनी यापुर्वी केलेल्या लग्न कार्यातील डेकोरेशन व इव्हेंट मॅनेजमेंटचे व्हिडिओ आणि माहिती पाहुन व वाचुन नोव्हेंबर २०२३ मध्ये फिर्यादी यांना संपर्क करून आरोपीची मुलगी अनुष्काचे लग्ना करिता डेकोरेशन व इव्हेंट मॅनेजमेंटचे काम असल्याचे फिर्यादी यांना सांगितले. त्यानंतर आरोपी व त्यांचे परिचयातील दिनेश दानवले रा. बारे ता. भोर जि. पुणे यांचे सह दिनांक ३०/११/२०२३ रोजी भोर येथे फिर्यादी यांचे घरी